## नि.क्र. ५ वरील आदेश

**CNR:MHSN14-000629-2023**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णनः–**

२. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी शिराळा पैकी मौजे वाकुर्डे बुद्रुक शेत शिवार व ग्रामपंचायत हद्दीतील भूमापन क्र. १५६/२० क्षेत्र ० हेक्टर १४.२० आर आकारणी १ रुपया हिस्सा संपूर्ण

त्याच्या चतुःसिमा–

पूर्वेस– श्री. रामचंद्र बाबुराव कांबळे यांची जमीन,

दक्षिणेस– पशुवैद्यकीय दवाखाना व बुध्द विहार समाज मंदीर,

पश्चिमेस– श्री. पांडुरंग लक्ष्मण कांबळे यांची जमीन,

उत्तरेस– सौ. बाळाबाई परसू नांगरे यांची जमीन,

येणेप्रमाणे शेत जमीन मिळकतीचे वर्णन त्यातील झाडझुड तदंगभूत वस्तू व इतर सर्व हक्कासह असे.त्यास यापुढे संक्षीप्त अर्थाने सदर अथवा दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. सदर मिळकत ही वादी यांची वडिलार्जित व अविभाजीत स्वरुपाची मिळकत आहे. त्यामध्ये सध्या भात पीक केलेले आहे. वादी, प्रतिवादीमध्ये नातेसंबंध दर्शविणारी वंशावळ खालीलप्रमाणे–

वाकू

आबा तुका

किसन आनंदा शांता बबन

४. प्रतिवादी हे गांवातील सधन कुटुंबातील व्यक्ती असून त्यांचा गांवच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये मोठा दबदबा आहे. स्थानिक व तालुक्याचे प्रशासन यामध्ये त्यांचे लागेबांधे असल्यामुळे प्रतिवादींचा समाजामध्ये नेहमीच धाक राहिलेला आहे.

५. अशी परिस्थिती असताना दि. ०३/०५/२०२३ रोजी सदर प्रतिवादी हे वादींच्या नमूद दावा मिळकतीमध्ये उत्तरेकडील हिश्यात दांडगाव्याने गुरांसाठी कच्चे शेड बांधू लागले. त्यास वादी क्र. १ यांनी हरकत हरकत, अडथळा केल्यानंतर सदर प्रतिवादी यांनी वादीवरच दमदाटी करुन तेथून त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला म्हणून प्रतिवादी वर संबंधीत शिराळा पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. क्र. २९२३ नुसार दि. १२/०५/२०२३ रोजी तक्रार दाखल केली. यावेळी संबंधीत पोलीसांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी/आरोपीचा राजकीय सामाजिक दरारा पाहून कोणतीच कारवाई केली नाही. त्यामुळे प्रतिवादी हे जास्तच शेफारुन गेलेले आहेत.

६. वादी हे जमीन मालक असले तरी ते अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्यांना नमूद मिळकती शिवाय अन्य उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे यातील प्रतिवादी यांचा दांडगावा यापुढे देखील कायम राहिलेस वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादी यास प्रशासनाखेरीज मनुष्यबळ व गावगुंड पुढाऱ्यांचा मोठा पाठिंबा आहे. याउलट यातील वादी हे कायदा पाळणारे इसम आहेत. न्यायाचा तराजू वादींचे बाजूने आहे. असे असले तरी, प्रतिवादी विरुध्द मनाईचा दावा दाखल केल्याशिवाय वादींना कोणताच तरुणोपाय नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा त्यांनी प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला आहे. सबब प्रतिवादी यांनी स्वतः अगर तर्फे त्रयस्त इसम यांनी वादींच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस कसलाही हरकत, अडथळा आणू नये वादींना दावा मिळकती मधून आऊस्ट करु नये, दावा मिळकतीचा दांडगाव्याने कब्जा घेऊ नये म्हणून

प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

७. प्रतिवादीतर्फे नि.क्र. ११ वर प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन त्यांनी असे कथन केले की, वादीचा तूर्तातूर्त मनाई अर्ज, ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर खोटा, चुकीचा व बेकायदेशीर असून तो या प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादींनी तूर्तातूर्त मनाई अर्जामध्ये दावा मिळकतीचे दिलेले वर्णन खोटे व काल्पनिक आहे. दावा मिळकतीमध्ये वादींची कोणत्याही हक्काने कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. या कारणामुळे व या कैफियत व म्हणण्यामध्ये नमूद केलेल्या सर्व कारणामुळे वादींचा दावा व तूर्तातूर्त मनाई अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नसून तो खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे हे मे.कोर्टासमोर दिसून येणार आहे.

८. दावा मिळकतीचे दिलेले वर्णन खोटे, चुकीचे व काल्पनिक आहे. त्यामुळे दावा मिळकतीचा स्पष्ट बोध होत नाही. वादींनी दावा मिळकतीचे वर्णन व चतुःसिमा वस्तुस्थितीप्रमाणे योग्य दिल्याशिवाय वादींचा दावा व तूर्तातूर्त मनाई अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. वास्तविक वादी यांनी दावा मिळकतीचा नकाशा फेरीस्त सोबत दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता व त्यामधील दावा मिळकतीच्या चतुःसिमा पाहिल्या असता व दावा व तूर्तातूर्त मनाई अर्जामध्ये दिलेल्या चतुःसिमा पाहिल्या असता त्या दोन्हीमध्ये विसंगती व भिन्नता दिसून येत आहे. यावरुन वादी हे स्वच्छ हाताने मे.कोर्टासमोर आलेले नाही व वादींचा याकामी हेतू स्वच्छ नाही हे स्पष्टपणे दिसून येत आहे. तसेच वादींना दावा मिळकतीची निश्चित माहिती नाही हे ही याकामी दिसून येत आहे. वादी हे दावा मिळकतीच्या चुकीच्या चतुःसिमा देऊन मे.कोर्टाकडून या प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त व निरंतर मनाईचा आदेश घेऊन प्रतिवादी यांच्या कब्जेवहिवाटीस असणाऱ्या मिळकतीमधून त्यांना बेकायदेशीररित्या आऊस्ट करण्याचा लबाडीने प्रयत्न करणार आहेत. यासर्व कारणामुळे तूर्तातूर्त मनाई अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे. वादींनी दिलेली वंशावळ चुकीची, अपुरी व संदिग्ध आहे. त्यावरुन वादींचे

नातेसंबंधाची स्पष्टता होत नाही. वादींनी त्यांचे वंशावळीमध्ये तुका यांना बबन हा मुलगा असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु, तुका वाकु कांबळे यांना दोन मुली आहेत. वादींनी मुद्दाम जाणुन–बुजून या दोन्ही मुलींची नांवे वंशावळीमध्ये नमूद केलेली नाहीत. तसेच तुका यांच्या त्या दोन मुलींना या दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाहीत. वास्तविक वादी नं. ३ बबन तुका कांबळे यास एकट्यास तुकाचा वारस म्हणून या प्रतिवादींच्या विरुध्द दावा कायद्याने करता येत नाही. तसेच वादींनी तुका यांचे दोन्ही मुलींबाबत कोणताही खुलासा त्यांचे दावा व तूर्तातूर्त मनाई अर्जामध्ये केलेला नाही. याही कारणावरुन वादींचा दावा व तूर्तातूर्त मनाई अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे. वादींची दावा मिळकतीमध्ये कधीही व कोणत्याही हक्काने कब्जेवहिवाट नव्हती व नाही. वादी हेच सधन कुटुंबातील असून त्यांचा गांवामध्ये फार दबदबा आहे. त्यांचे धाकाने व दबदब्यामुळे गांवात वादींचे विरुध्द कोणीही बोलण्यास तयार नसतात. वादींचा गांवात तसेच शासकीय कार्यालयामध्ये वशीला आहे. या सर्व गोष्टींमुळे वादी हे प्रतिवादी यांना नेहमीच दहशत करुन त्यांना दमदाटी करीत असतात. प्रतिवादी हे गरीब असून ते मोलमजुरी करुन त्यांचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. त्यांना कोणाचेही पाठबळ नाही. वादींच्याकडून होणाऱ्या त्रासाला प्रतिवादी हे वैतागून गेले आहेत. प्रतिवादी यांना नाहक त्रास देऊन त्यांचा शारीरीक, मानसिक व आर्थिक पिळवणुक केलेली आहे. त्यामुळे वादींनी प्रतिवादींना कॉम्पेसेटरी कॉस्ट म्हणून रक्कम रु. १,००,०००/– देणेचा आदेश होणे योग्य व कायदेशीर होणार आहे. सबब, वादींचा तूर्तातूर्त मनाईचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

९. वादींतर्फे विधिज्ञ श्री. आर. बी. पाटील तसेच प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एन. टी. सूर्यवंशी यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे कथनांनुसार युक्तीवाद केला. वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने व युक्तीवादावरुन माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृत दर्शनी केस सिध्द केली आहे का ? | **नकारार्थी** |
| २. | दाव्याचा कल वादींच्या बाजूने आहे का ? | **नकारार्थी** |
| ३. | वादींच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल का ? | **नकारार्थी** |
| ४. | कोणता आदेश ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

**१०.** वादी यांनी अर्जाचे कथनापृष्टयर्थ कागदयादी नि.क्र. ३ सोबत मौजे वाकुर्डे बुद्रुक येथील भू.मा.क्र. १५६/२० चा ७/१२ उतारा, गट बुकावरुन दिलेला नकाशा व मुखत्यारपत्राची व्हेरीफाईड प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**११.** प्रतिवादीतर्फे नि.क्र. १३ सोबत मौजे वाकुर्डे बुद्रुक येथील भूमापन क्र. १५६/१९ चा ७/१२ उतारा, मौजे वाकुर्डे बुद्रुक येथील भूमापन क्र. १५६/२१ चा ७/१२ उतारा, मौजे वाकुर्डे बुद्रुक येथील भूमापन क्र. १५६/२६ चा ७/१२ उतारा असे कागदपत्र दाखल केले.

## कारणमिमांसा

### मुद्दा नं. १ ते ३ करीता :-

**१२.** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे कोणत्या परिस्थीतीत तुर्तातुर्त ताकिद देता येईल याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. न्यायालयाच्या समोर एखाद्या दाव्यामध्ये शपथेवर एखादे कथन सिध्द करुन अथवा अन्य मार्गाने जर दावा मिळकत ही नुकसान, नाश अथवा हस्तांतरित करण्याच्या विचारात दाव्यातील संबंधित पक्षकार असतील अथवा संबंधित

मिळकत ही बेकायदेशीररित्या एखाद्या दरखास्तीच्या मागणीमध्ये विक्री होत असेल, प्रतिवादी हे दावा मिळकत त्या जागेवरुन हालवायचा प्रयत्न करत असतील अथवा नाश करण्याचा प्रयत्न करत असतील, प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करत असतील किंवा त्या अनुषंगाने वादीला नुकसान होईल असे कृत्य करत असतील तर न्यायालयाला सदरचे कृत्य थांबवण्याच्या उद्देशाने तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्याचे ऐच्छीक अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दिलेले आहेत. परंतु सदरचे अधिकार वापरताना न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांची कथने व पुरावा याचा विचार करुन वस्तुस्थिती संदर्भात न्याय देण्यासाठी ऐच्छीक अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज मंजूर होण्यापुर्वी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व कधीही भरुन न येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

**१३.** वादींचे कथनांनुसार दावा मिळकत वादी यांचे वडिलार्जित मिळकत असून ते त्यामध्ये भात पिक घेतात. वादींनी नि.क्र. ३ सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे त्यामध्ये वादींचे नांव नमूद असल्याचे दिसते. त्यामुळे प्रतिवादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध दिसून येत नाही. वादींनी नि.क्र. ३ सोबत गट बुकावरुन तयार केलेल्या नकाशाची प्रत दाखल केली आहे. सदर नकाशा पाहता दावा मिळकत भूमापन क्र. १५६/२० चे पूर्वेला भूमापन क्र. १५६/२१, पश्चिमेला भूमापन क्र. १५६/१९, दक्षिणेला भूमापन क्र. १५६/२६ असल्याचे दिसते. प्रतिवादीतर्फे नि.क्र. १३ सोबत सदर मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. भूमापन क्र. १५६/२१ चा ७/१२ उतारा पाहता त्यामध्ये कांबळे आडनांवाचे लोकांची नांवे नमूद असल्याचे दिसते. मात्र, वादींनी दावा मिळकतीच्या पूर्वेच्या चतुःसिमेत नमूद केलेले नांव रामचंद्र बाबूराव कांबळे हे सदर उताऱ्यामध्ये दिसून येत नाही. भूमापन क्र. १५६/१९ चा ७/१२ उतारा पाहता त्यामध्ये माने, जगताप, महाडीक, घोलप व कांबळे आडनांवाचे लोकांची नांवे नमूद असल्याचे दिसते मात्र, वादींनी दावा मिळकतीच्या पश्चिमेच्या चतुःसिमेत

नमूद केलेले नांव पांडुरंग लक्ष्मण हे सदर उताऱ्यामध्ये दिसून येत नाही. भूमापन क्र. १५६/२६ चा ७/१२ उतारा पाहता त्यामध्ये सोनकळसे, कांबळे, आडसुळे, वाघमारे वगैरे आडनांवाचे लोकांची नांवे नमूद असल्याचे दिसते मात्र, वादींनी दावा मिळकतीच्या दक्षिणेच्या चतुःसिमेत नमूद केलेप्रमाणे पशुवैद्यकीय दवाखाना व बुध्दविहार समाज मंदीराची नोंद सदर उताऱ्यामध्ये दिसून येत नाही. यावरुन वादींनी दावा मिळकतीच्या चतुःसिमा चुकीच्या वर्णन केल्या असल्याचे अथवा दावा मिळकतच चुकीची नमूद केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

**१४.** वादींचे कथनांनुसार प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये उत्तरेकडील हिश्यात दांडगाव्याने गुरांसाठी कच्चे शेड बांधू लागले. मात्र, वादींनी दावा मिळकतीच्या दिलेल्या चतुःसिमेमध्ये उत्तरेस बाळाबाई परसू नांगरे यांची मिळकत असल्याचे नमूद केले आहे. दावा मिळकतीच्या चतुःसिमेमध्ये प्रतिवादीचे नांव कोठेही नाही. वादींनी प्रतिवादी गुरांसाठी कच्चे शेड बांधू लागल्याबाबतचा कोणताही पुरावा दाखल केला नाही. तसेच वादी नं. १ ने हरकत केल्यानंतर प्रतिवादीने वादींवर दमदाटी करुन हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला म्हणून प्रतिवादीविरुध्द शिराळा पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. नं. २९२३ नुसार दि. १२/०५/२०२३ रोजी तक्रार दाखल केली. मात्र, सदर तक्रारीची प्रत देखील वादींतर्फे प्रकरणात दाखल केली नाही. उपरोक्त विवेचन पाहता प्रतिवादीचा दावा मिळकतीत अथवा दावा मिळकतीचे चुतःसिमेतील मिळकतीत कोणताही हक्क, हितसंबंध दिसून येत नाही. तसेच, कच्चे शेड बांधकामाबाबत अगर प्रतिवादीविरुध्द तक्रार दाखल केल्याबाबतचा इतर कोणताही पुरावा वादीतर्फे दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे अशापरिस्थितीत प्रतिवादीने दावा मिळकतीत शेड बांधू लागल्याचा अगर वादींचे वहिवाटीस हरकत, अडथळा केल्याचे समोर आले नाही.

**१५.** एकंदरीत विवेचनावरुन वादींना प्रथमदर्शनी केस नसल्याचे तसेच न्यायाचा तराजू देखील वादींच्या बाजुने झुकणारा नसल्याचे दिसते. तूर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर

होणेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादींचा अर्ज नि.क्र. ५ नामंजूर करण्यात येतो.

**३.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.05.03 17:56:07 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक – ०३/०५/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 03/05/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 03/05/2025 |
| Order uploaded on | : | 03/05/2025 |